

जो जैसा करता है,
वैसा भरता है
कर्मों का फल हमेशा प्राप्त होता है।

www.attalmat.com

# अट्टलमत

RNI.No. MAHMAR/2007/21199 Postal Regd. No : H2/RNP/AGD/283/2022-23

■ वर्ष -१९, अंक-८ ■ छत्रपती संभाजीनगर, सोमवार, दि. २७ ऑक्टोबर २०२५ ■ किंमत २ रूपये, पाने -४


## पंढरपूरमध्ये कार्तिकी यात्रेला प्रारंभ, २४ तास दर्शनाची सुविधा!

पंढरपूर : पंढरपूरमध्ये विठ्ठल-रुक्मिणी दर्शनासाठी येणाऱ्या भाविकांसाठी एक आनंदाची बातमी आहे. भक्तीच्या महासागरात दरवर्षी भाविकांनी भरून जाणाऱ्या पंढरपूर नगरीत यंदाच्या कार्तिकी यात्रेचा लवकरच प्रारंभ होत आहे. यात्रेच्या काळात वाढणारी भाविकांची गर्दी लक्षात घेऊन श्री विठ्ठल-रुक्मिणी मंदिर समितीकडून विशेष धार्मिक आणि प्रशासकीय व्यवस्था करण्यात आली आहे. विधिवत पूजा करून श्रींचा पलंग काढण्यात आला आहे, आणि आता भाविकांना २४ तास दर्शनाची सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे, अशी माहिती मंदिर समितीचे सहअध्यक्ष गहिनीनाथ महाराज औसेकर यांनी दिली.

श्री विठ्ठल मूर्तीच्या पाठीशी 'लोड' तर रुक्मिणी



मातेच्या मूर्तीच्या पाठीशी 'तक्क्या' ठेवण्यात आले आहे. या पारंपरिक विधीनंतर आता विठ्ठल-रुक्मिणीचे दर्शन अखंड सुरू राहणार आहे. यावेळी काकडा आरती, पोशाख, धुपारती, शेजारती या राजोपचारांना तात्पुरता विराम देण्यात आला असून, नित्यपूजा, महानैवेद्य आणि गंधाक्षता हे राजोपचार सुरू राहतील. भाविकांना हे अखंड दर्शन ९ नोव्हेंबर म्हणजेच प्रक्षाळपूजेपर्यंत पर्यंत मिळणार आहे.

गर्दी नियंत्रणासाठी आणि दर्शनरांगा जलदगतीने पुढे सरकाव्यात यासाठी प्रशासनाने योग्य उपाययोजना केल्या आहेत. परंपरेनुसार पलंग काढल्यानंतर श्रींचे २४ तास मुखदर्शन व २२.१५ तास चरणदर्शन उपलब्ध असते. तसेच मंदिर समितीच्या संकेतस्थळावरून आणि विविध ठिकाणी लावलेल्या एलईडी पडद्यांद्वारे लाईव्ह दर्शनाची सुविधा भाविकांसाठी उपलब्ध करण्यात आली आहे. यात्रेच्या काळात सर्व व्हीआयपी दर्शन आणि खास पूजा बंद ठेवण्यात आल्या आहेत. श्रींच्या परंपरेनुसार सर्व धार्मिक विधी काटेकोरपणे पार पाडले जात असून, पलंग काढणे, एकादशी पूजन, महानैवेद्य, पादुकांची मिरवणूक, महाद्वार काला व प्रक्षाळपूजा या विधींचे नियोजन पूर्ण करण्यात आले आहे, अशी माहिती समितीकडून देण्यात आली आहे. मागील आषाढी यात्रेतील अनुभव लक्षात घेऊन यंदाच्या कार्तिकी यात्रेचे नियोजन अधिक सुयोग्यपणे करण्यात आले आहे.

## यंदा कर्तव्य असणाऱ्यांसाठी गुड न्यूज

### नोव्हेंबरपासून जूनपर्यंत तब्बल ६८ विवाह मुहूर्त

छत्रपती संभाजीनगर
(अट्टल मत प्रतिनिधी)

तुळशी विवाहानंतर लग्नसराईचा धडाका सुरू होतो. यंदा नोव्हेंबरपासून जूनअखेरपर्यंत तब्बल ६८ विवाह मुहूर्त आहेत. वैदिक परंपरेनुसार आषाढ महिन्यातील शुक्ल पक्षातील एकादशी (देवशयनी) ते कार्तिक शुक्ल एकादशीपर्यंत चातुर्मास पाळला जातो. यावर्षी भागवत एकादशी २ नोव्हेंबरला आहे.



द्वादशीला श्रीकृष्ण यांच्याशी तुळशीचा विवाह लावण्यात येतो. तेव्हापासून वैवाहिक मुहूर्त काढले जाण्याची परंपरा आहे. यावर्षी तुळशीचा विवाह कार्तिक शुक्ल द्वादशी बुधवार, २ नोव्हेंबरपासून, कार्तिक पौर्णिमा शुक्रवार, ५ नोव्हेंबरपर्यंत करावयाचा आहे. त्यानंतर माणसांच्या विवाह सोहळ्यांना प्रारंभ होईल.

डिसेंबर २०२५ मध्ये लग्नासाठी ४, ५ आणि ६ डिसेंबर या तीन शुभ तारखा आहेत. जानेवारी २०२६ या महिन्यात शुक्र ग्रहाच्या दहनामुळे आणि इतर प्रतिकूल घटकांमुळे लग्नासाठी शुभ मुहूर्त नाही. त्यामुळे, लग्न करण्यासाठी हा काळ शुभ नाही. फेब्रुवारी २०२६ मध्ये ५, ६, ८, १०, १२, १४, १९, २०, २१, २४, २५ आणि २६ या दिवशी विवाह मुहूर्त आहेत.

मार्च हा एक संक्रमणकालीन महिना म्हणून ओळखला जातो, जो उबदार वसंत ऋतूचे स्वागत करतो आणि हिवाळ्याला निरोप देतो. मार्च २०२६ मध्ये २, ३, ४, ७, ८, ११, १२ रोजी विवाह मुहूर्त आहेत. एप्रिल हा फुलांचा महिना, जेव्हा वसंत ऋतू त्याच्या शिखरावर असतो. या महिन्यात १५, २०, २१, २५, २७, २८ आणि २९ तारखेला विवाह मुहूर्त आहेत. मे २०२६ मध्ये हिंदू पंचांगामध्ये लग्नासाठी ८ शुभ मुहूर्त आहेत.

त्यात १, ३, ५, ६, ७, ८, १३ आणि १४ मे २०२६ या तारखांचा समावेश आहे. जून २०२६ महिन्यात उन्हाळ्याचे लांब दिवस, तेजस्वी सूर्यकिरणांसह आपले आत्मे शुद्ध करतात. या महिन्यात २१, २२, २३, २४, २५, २६, २७ आणि २९ जून २०२६ या ८ तारखांना लग्नाचे मुहूर्त असल्याचे हिंदू पंचांगामध्ये नोंद आहे.

### रेल्वे फलकावर उर्दूतील छत्रपती संभाजीनगर नावामुळे वाद

## उर्दूभाषेतील नाव काढा, अधिकाऱ्यावर कारवाई करा - आमदार संजय केणेकर



"निजामी भाषा आमच्यावर का थोपताय असे म्हणत आमदार संजय केणेकर यांचा अधिकाऱ्यांना संतप्त सवाल.

दिनेश परदेशी
(अट्टल मत विशेष प्रतिनिधी)

राजपत्रात मराठी, हिंदी, आणि इंग्रजी या भाषांत नाव लिहिण्याचे सूचित केले असताना उर्दुत लिहिलेच कशावरून आश्चर्यचकित होण्यासारखे आहे. राजपत्रात उर्दू भाषेचा उल्लेखच केलेला नव्हता तरी देखील त्या भाषेत का टाकले? नवीन वाद मुजोर अधिकाऱ्यांनी केला आहे.ज्या निजामामुळे आम्हाला एक वर्ष उशीरा स्वातंत्र्य मिळाले. मनातून छाताडावर बसलेला आक्रांत निजाम आम्ही संपवण्याचा प्रयत्न करत होतो. जी भाषा निजाम काळात रेल्वे स्थानकावर पाहण्यास मिळत होती. तीच भाषा पुन्हा मुजोर अधिकाऱ्यांनी फलकावर टाकून नवीन वादाला तोंड फोडले आहे.

हिंदी भाषा, मातृभाषा व पर्यटकांना सुलभ व्हावी अशी इंग्रजी भाषा. पर्यटनाच्या दृष्टीकोनातून महत्त्वाची आहे. या तीन भाषा या नामफलकावर




असणे आवश्यक आहे. परंतु उर्दू भाषेत टाकण्याचा प्रश्नच येत नाही.मुद्दाम खोळसाळपणा केल्याचा प्रकार दिसत आहे. याची तक्रार मी रेल्वेमंत्री म होदयांकडे केली आहे. यांना मी बोललो आहे की, सदरील अधिकाऱ्याने नसता उपद्व्याप करण्याचे काम केले आहे. खरे तर निजामाच्या जोखडातून आम्हाला निघता निघता आमचा दम गेला होता. त्याच निजामाची छाप आमच्या उरावर ठेवणारा हा अधिकारी नेमका कोणत्या उद्देशाने हे काम करत आहे. याची सखोल चौकशी केली पाहिजे ही भूमिका घेवून मी कारवाई करण्याची मागणी केली आहे.

## १ नोव्हेंबरपासून जीएसटी नोंदणी आणखी सोपी होणार

नवी दिल्ली : केंद्र सरकारने १ नोव्हेंबरपासून वस्तू आणि सेवा कर नोंदणी आणखी सोपी करण्यासाठी नवी प्रणाली सुरू करण्याचा निर्णय घेतला आहे. नव्या प्रणालीनुसार जीएसटी नोंदणीसाठी अर्ज केल्यानंतर फक्त कार्यालयीन कामकाजाच्या ३ दिवसांमध्ये मंजुरी मिळेल. सरकारद्वारे आणलेल्या जीएसटी सुधारणांतर्गत जीएसटी परिषदेनं याला मंजुरी दिली आहे.

नव्या नोंदणी प्रक्रियेत पहिल्यापेक्षा आणि अधिक सोपी होईल आणि मानवी हस्तक्षेप कमी होईल. नव्या व्यवस्थेनुसार दोन प्रकारच्या अर्जांना स्वयंचलित पद्धतीनं नोंदणी मिळेल. पहिले म्हणजे जे लोक ज्यांना सिस्टीमनं डेटा आणि जोखीम विश्लेषणच्या आधारावर निवडलेलं असेल. दुसरा प्रकार ज्यांचा आऊटपूट टॅक्स दरमहा २.५ लाख रुपयांपेक्षा कमी आहे.

अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांच्या मते, नव्या प्रक्रियेनुसार जवळपास ९६ टक्के नव्या अर्जदारांना याचा थेट फायदा होईल. गाझियाबादमध्ये नव्या सीजीएसटी भवनाचं उद्घाटन केल्यानंतर अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी म्हटलं की सरकारचं लक्ष आता नवं धोरण बनवण्याऐवजी स्थानिक स्तरावर धोरणांच्या योग्य प्रकारच्या अंम लबजावणीवर केंद्रित होत आहे.

## फलटण महिला डॉक्टर आत्महत्या प्रकरण : पीएसआय बदनेला ३० ऑक्टोबरपर्यंत पोलीस कोठडी

सातारा (अट्टल मत प्रतिनिधी)

फलटण येथे उपजिल्हा रुग्णालयातील एका तरुण महिला डॉक्टरच्या आत्महत्येच्या प्रकरणाने संपूर्ण राज्यात खळबळ उडाली आहे. या प्रकरणात पोलिसांनी आरोपी असलेल्या निलंबित पोलीस उपनिरीक्षक (पीएसआय) गोपाल बदने आणि प्रशांत बनकर या दोघांनाही अटक केली असून, त्यांची कसून चौकशी सुरू आहे.

गुरुवारी रात्री डॉक्टर तरुणीने एका हॉटेलमध्ये गळफास घेऊन आत्महत्या केली होती. घटनेनंतर पोलिसांना तिच्या हातावर लिहिलेला संदेश आढळून आला. त्यात तिने आपल्या मृत्यूसाठी पीएसआय गोपाल बदने यांना जबाबदार ठरवत त्यांनी माझ्यावर चार वेळा अत्याचार केला, तसेच प्रशांत बनकरने गेल्या काही महिन्यांपासून शारीरिक आणि मानसिक त्रास दिला, असे नमूद केले होते.

घटनेनंतर काही दिवसांच्या शोधमोहिमेनंतर निलंबित पीएसआय गोपाल बदने शनिवारी रात्री उशिरा फलटण पोलिस ठाण्यात आत्मसमर्पण केले. त्यानंतर रविवारी त्याला न्यायालयात हजर करण्यात आले. सुनावणीनंतर न्यायालयाने बदनेला ३० ऑक्टोबरपर्यंत पोलीस कोठडी सुनावली आहे.







बदनेच्या वतीने वकील राहुल धायगुडे यांनी कोर्टात युक्तिवाद करताना सांगितले की, मृत डॉक्टरने आपल्या सुसाईड नोटमध्ये कोणत्या ठिकाणी आणि कधी अत्याचार झाले हे स्पष्ट नमूद केलेले नाही. त्यामुळे हे आरोप अस्पष्ट असून, त्याला कोणतेही ठोस पुरावे नाहीत, असे त्यांनी सांगितले. दरम्यान, सरकारी वकीलांनी मात्र या युक्तिवादाला विरोध करत सर्वोच्च न्यायालयातील उदाहरण देत सांगितले की, मरणाऱ्याचे शब्द हे सत्य म नले जातात. त्यामुळे सखोल तपासासाठी पोलिसांना वेळ देणे आवश्यक असल्याचे त्यांनी कोर्टासमोर मांडले.

या प्रकरणातील दुसरा आरोपी प्रशांत बनकरला न्यायालयाने आधीच २८ ऑक्टोबरपर्यंत पोलीस कोठडी सुनावली आहे. डॉक्टरने आपल्या सुसाईड नोटमध्ये बनकरवर मानसिक आणि शारीरिक छळाचे गंभीर आरोप केले आहेत. पोलिस सध्या या दोन्ही आरोपींच्या चौकशीसह संपूर्ण प्रकरणातील पुरावे तपासत आहेत.

## संपादकीय

# चीनमध्ये गलका, ट्रम्पना दणका

अलीकडच्या चर्चीत आंतरराष्ट्रीय आर्थिक घडामोडींपैकी एक म्हणजे भाराताच्या वाढत्या ईव्ही उत्पादनामुळे ड्रॅगनला पोटशूळ उठला आहे. दरम्यान, जागतिक बाजारपेठेमध्ये सतत माकडचेष्टा करणाऱ्या ट्रम्प यांच्या विरोधात अमेरिकन कंपन्या न्यायालयात गेल्याचे वृत्त आहे. अन्य एक लक्षवेधी बातमी म्हणजे देशातील पहिले 'ग्रीन स्टील हब' गडचिरोलीमध्ये उभे राहत असून तेथील उद्योग आणि समाजचित्र पालटत आहे.

अलीकडे आंतरराष्ट्रीय पातळीवर अधिक वेगवान आर्थिक घडामोडी अनुभवायला मिळत आहेत. त्यापैकी एक महत्त्वाची बातमी म्हणजे भारताच्या ईव्ही उत्पादनामुळे ड्रॅगनला पोटशूळ उठला आहे. दरम्यान, जागतिक बाजारपेठेमध्ये सतत माकडचेष्टा करणाऱ्या ट्रम्प यांच्याविरोधात अमेरिकन कंपन्या न्यायालयात गेल्याचे वृत्त आहे. अन्य एक लक्षवेधी बातमी म्हणजे देशातील पहिले 'ग्रीन स्टील हब' गडचिरोलीमध्ये उभे राहत असून तेथील उद्योग आणि समाजचित्र पालटत आहे. भारत इलेक्ट्रिक वाहन (ईव्ही) आणि बॅटरी उत्पादनात वेगाने विकास करत आहे. सरकारने या क्षेत्रात देशांतर्गत उत्पादनाला प्रोत्साहन देण्यासाठी अनेक योजना सुरू केल्या आहेत. त्यामुळे भारताला जगातील सर्वात मोठ्या 'ईव्ही' बाजारपेठेत स्थान मिळवता आले आहे. तथापि, या वाढत्या यशावर चीन नाराज आहे. त्याने जागतिक व्यापार संघटनेकडे भारताविरुद्ध तक्रार दाखल केली आहे. चीन म्हणतो, की भारताच्या अनुदान योजना जागतिक व्यापार नियमांचे उल्लंघन करतात. मुळात, चीनला भारताने या क्षेत्रात मुसंडी मारणे अपेक्षित नाही, कारण तो या वेगाने वाढणाऱ्या भारतीय औद्योगिक धोरणाला धोका मानतो. चीनच्या तक्रारीचा केंद्रबिंदू भारताची उत्पादन-लिंक्ड इन्सेंटिव्ह (पीएलआय) योजना आणि 'ईव्ही' धोरण आहे. ही धोरणे भारतीय कंपन्यांना अनुदाने देतात; जेणेकरून ते देशांतर्गत अधिक इलेक्ट्रिक वाहने आणि बॅटरी तयार करू शकतील. चीनचा आरोप आहे, की ही अनुदाने नियमांच्या विरुद्ध आहेत. कारण ते परदेशी कंपन्यांना स्पर्धेसाठी समान व्यासपीठ प्रदान करत नाहीत आणि स्थानिक उत्पादनांना प्रोत्साहन देऊन आयात कमी करण्याचा प्रयत्न करतात.

जागतिक व्यापार संघटनेच्या नियमांनुसार, अशी कोणतीही तक्रार प्रथम सल्लामसलत करून सोडवली जाते. चीनने तुर्कस्तान, कॅनडा आणि युरोपीय महासंघाविरुद्धदेखील अशाच तक्रारी केल्या आहेत. तिथे हरित तंत्रज्ञानासाठी पाठिंबा वाढवला जात आहे. भारत आर्थिक विकास आणि राष्ट्रीय सुरक्षेसाठी आयातीवरील अवलंबित्व कमी करू इच्छित आहे. 'ईव्ही' आणि बॅटरी उद्योग या धोरणाचा एक महत्त्वाचा भाग आहेत. सरकारने या क्षेत्रांमध्ये देशांतर्गत उत्पादन वाढवण्यासाठी विशेष प्रोत्साहने दिली आहेत, जेणेकरून भारत स्वतःहून उच्च-तंत्रज्ञान उत्पादने तयार करू शकेल. ही धोरणे हळूहळू कार्यरत आहेत आणि भारत एक प्रमुख उत्पादन केंद्र बनण्याच्या दिशेने वाटचाल करत आहे. चीनसाठी हे चिंतेचे कारण आहे. कारण भारताची वाढ चीनच्याच जागतिक उत्पादनशक्तीला आव्हान देत आहे.

चीन भारतावर ज्या धोरणांचा आरोप करतो, ते चीनच्या स्वतःच्या औद्योगिक धोरणांची प्रतिकृती आहे. अनेक दशकांपासून चीनने मोठ्या प्रमाणात अनुदाने, स्वस्त कर्जे आणि संरक्षणवादी धोरणांद्वारे आपल्या देशांतर्गत उद्योगांना चालना दिली आहे. या धोरणामुळे चीन हे जगातील सर्वात मोठे उत्पादन केंद्र बनले आहे. आता भारत हे मॉडेल स्वीकारत आहे. त्यामुळे चीन नाराज झाला आहे. चीनने जागतिक व्यापार संघटनेकडे औपचारिक तक्रार दाखल केली. चीनने भारतावर त्यांच्या नवीन इलेक्ट्रिक वाहन आणि बॅटरी अनुदान योजनांद्वारे देशांतर्गत उद्योगांना अन्यायपणे फायदा करून देत असल्याचा आरोप केला आहे. त्यामुळे चीनी कंपन्यांना नुकसान झाले आहे. भारताच्या या योजनांमुळे चीनच्या बाजारपेठेत घसरण होऊ शकते. म्हणूनच चीनने भारताच्या नवीन योजनेला विरोध केला आहे. या घडामोडींमुळे घाबरलेल्या चीनने एक निवेदन जारी करून म्हटले आहे, की भारताने ही चूक ताबडतोब दुरुस्त करावी, अन्यथा चीन आपल्या देशांतर्गत कंपन्यांचे संरक्षण करण्यासाठी कठोर पावले उचलेल. जागतिक तज्ज्ञांचे मत आहे की भारत आणि चीनमधील हा संघर्ष केवळ नवीन धोरणांबद्दल नाही. चीन भारताकडे एक मजबूत स्पर्धक म्हणून पाहत असल्याने अशा प्रकारे नोंद घेत आहे.

आता बातमी ट्रम्पतात्यांना बसलेल्या दणक्याची. नवीन एच-१ बी व्हिसा अर्जदारांवर एक लाख डॉलर शुल्क लादण्याच्या डोनाल्ड ट्रम्प प्रशासनाच्या निर्णयाविरुद्ध 'अमेरिकन चेंबर ऑफ कॉमर्स'ने खटला दाखल केला आहे. चेंबरने या निर्णयाला 'अन्याय्य' आणि कायदेशीररीत्या चुकीचे म्हटले आहे. शुल्काची घोषणा एका महिन्यापूर्वी करण्यात आली होती आणि 'व्हाईट हाऊस'ने अमेरिकन कामगारांच्या जागी स्वस्त परदेशी प्रतिभा नियुक्त करणाऱ्या कंपन्यांविरुद्धचा उपाय म्हणून त्याचे वर्णन केले होते. अधिकाऱ्यांनी नंतर स्पष्ट केले, की हे शुल्क विद्यमान व्हिसा धारकांना नव्हे, तर केवळ नवीन अर्जदारांना लागू होईल. शिवाय या शुल्काच्या माफीसाठी अर्जदेखील उपलब्ध करून देण्यात आला आहे. चेंबरने म्हटले आहे, की हे शुल्क इमिग्रेशन कायद्याचे उल्लंघन करते. ट्रम्प प्रशासनाविरुद्ध हा खटला चेंबरची पहिली कायदेशीर कारवाई आहे. हे चेंबर तीस हजारांहून अधिक व्यवसायांचे प्रतिनिधित्व करते. या खटल्यात गृह सुरक्षा विभाग आणि परराष्ट्र विभाग यांना प्रतिवादी म्हणून नामांकित केले आहे. त्यात म्हटले आहे, की अमेरिकेमध्ये गैर-नागरिकांच्या प्रवेशाचे नियमन करण्याचे व्यापक अधिकार अध्यक्षांना आहेत; परंतु हे अधिकार कायद्याने मर्यादित आहेत. काँग्रेसने संमत केलेले कायदे रद्द करता येत नाहीत. पूर्वी एच-वन बी व्हिसा अर्जाची किंमत अंदाजे तीन हजार सहाशे डॉलर होती. चेंबरच्या मते इतक्या उच्च शुल्कामुळे कंपन्यांना कुशल कामगारांची भरती कमी करणे टाळण्यास भाग पाडले जाऊ शकते. टीकाकार म्हणतात, की 'एच-वन बी' आणि इतर कुशल कामगार व्हिसा कार्यक्रम अमेरिकन कामगारांच्या जागी स्वस्त कामगार आणतात, तर व्यावसायिक गटांचा युक्तिवाद आहे की कामगारांच्या कमतरतेला तोंड देण्यासाठी कमी किमतीचा व्हिसा आवश्यक आहे. विशेषतः अभियांत्रिकी, आयटी आणि आरोग्य विज्ञान यासारख्या क्षेत्रात अशा कामगारांची संख्या जास्त असते.

# शिवसेना मध्यवर्ती कार्यालयात मराठवाडा पदवीधर नोंदणीपूर्व बैठक संपन्न




**छत्रपती संभाजीनगर (अट्टल मत प्रतिनिधी)**

छत्रपती संभाजीनगर येथील शिवसेना मध्यवर्ती कार्यालयात मराठवाडा पदवीधर मतदारसंघाच्या नोंदणीपूर्व तयारीसंदर्भात बैठक पार पडली. या बैठकीत आगामी नोंदणी मोहिमेची रूपरेषा, कार्यकर्त्यांच्या जबाबदाऱ्या तसेच जनजागृती कार्यक्रमांच्या नियोजनावर सविस्तर चर्चा करण्यात आली. बैठकीला जिल्ह्याचे पालकमंत्री संजयजी शिरसाट, खासदार संदीपानजी भुमरे, माजी आमदार कैलासजी पाटील, माजी महापौर नंदकुमार घोडीले, विकास जैन, जिल्हाप्रमुख राजेंद्र जंजाळ, संजय तायडे, शहरप्रमुख विश्वनाथ राजपुत, महिला आघाडीच्या शिल्पाराणी वाडकर, युवासेना मराठवाडा निरीक्षक ऋषिकेश जैस्वाल, जिल्हाप्रमुख शेखर जाधव आदी मान्यवर, पदाधिकारी आणि शिवसैनिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. बैठकीत मार्गदर्शन करताना पालकमंत्री संजयजी शिरसाट यांनी पदवीधर मतदार नोंदणीचे महत्त्व अधोरेखित केले. त्यांनी सांगितले की, युतीचा निर्णय नंतर घेतला जाईल, पण आपल्यालाही निवडणूक लढवण्याची तयारी आतापासून ठेवली पाहिजे.

प्रत्येक निवडणुकीसाठी पदवीधर नोंदणी आवश्यक आहे. ही निवडणूक आपण लढविण्याची ताकद आपल्यात आहे आणि ती दाखवून द्यायची आहे. आपण उमेदवार दिला, तर तो निवडूनच आला पाहिजे अशी संघटनात्मक ताकद आपल्याला तयार करायची आहे. त्यांनी पुढे कार्यकर्त्यांना उद्देशून स्पष्ट संदेश दिला. प्रत्येक कार्यकर्ता कामाला लागला पाहिजे. बोगस नोंदणी करू नका आणि कोणालाही करू देऊ नका आपले प्रत्येक कार्यकर्ते कामाला लागले तर युतीचा उमेदवार कोणताही असो तो विजयी होणारच. बैठकीत उपस्थित सर्व पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांनी आगामी नोंदणी मोहिमेसाठी सक्रिय सहभाग आणि सज्जतेचा निर्धार व्यक्त केला. शिवसेनेच्या संघटनात्मक ताकदीच्या बळावर आगामी निवडणुकीत भक्कम यश संपादन करण्याचा आत्मविश्वास यावेळी व्यक्त करण्यात आला.

**बैठकीत तांत्रिक कारणास्तव माईक बंद**

बैठकीत ऋषीकेश जैस्वाल यांच्याकडून मनोगत व्यक्त केल जात  असताना तांत्रिक कारणास्तव माईक बंद पडला. तात्काळ त्यांनी विनामाईक बोलणे सुरू केले. राजकीय नेत्यांची व कार्यकर्त्यांची मन मात्र त्यांनी यावेळी जिंकले.

# भाऊसाहेब जगताप यांच्याकडून दिवाली स्नेहमिलन कार्यक्रम

**छत्रपती संभाजीनगर (अट्टल मत प्रतिनिधी)**

सिडको ब्लॉक काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष भाऊसाहेब जगताप यांनी दिवाली स्नेहमिलन कार्यक्रमाचे आयोजन केले होते. या कार्यक्रमाला जालना लोकसभेचे लोकप्रिय खासदार डॉ. कल्याणराव काळे साहेब, जिल्हा काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष किरण पाटील डोणगावकर, कृषी उत्पन्न बाजार समितीचे माजी सभापती जगन्नाथ काळे, अल्पसंख्याक काँग्रेसचे राष्ट्रीय सचिव नासेर नासिर खान अल्पसंख्यांक जिल्हा काँग्रेस कमिटीचे जिल्हाध्यक्ष अनिस पटेल अल्पसंख्याक शहरजिल्हा काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष मोईन इनामदार व करंजखेडा जिल्हा परिषद सर्कलचे भावी उमेदवार उसामा नासेर खान उपस्थित होते.



# भागवत कथा ग्रंथाचे पूजनप्रसंगी  रामगिरी महाराजांचे अनुराधाताई चव्हाण यांनी आशीर्वाद घेतले



**छत्रपती संभाजीनगर (अट्टल मत प्रतिनिधी)**

कोलठानवाडी येथील किरण दौड या तरुणाने स्वतःच्या ५ एकर शेतात स्वखर्चाने श्री खाटूशाम बाबा आणि श्री राधाकृष्ण मंदिर उभारण्याचा संकल्प करून एक प्रेरणादायी आणि आदर्श निर्माण केला आहे. प.पू.स्वामी गोविंद देवगिरी महाराज, प.पू. सद्गुरू श्री रामगिरी महाराज आणि श्री ह.भ.प.घुले महाराज यांच्या शुभहस्ते या भव्य मंदिराच्या भूमिपूजन सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते. सद्गुरू श्री रामगिरी महाराज यांच्या वाणीतून ७ दिवसांच्या श्रीमद भागवत कथेचे आयोजन करण्यात आले. यावेळी आमदार अनुराधाताई अतुल चव्हाण यांनी उपस्थित राहून भागवत कथा ग्रंथाचे पूजन केले व रामगिरी महाराजांचे आशीर्वाद घेतले.

# दिवाळीच्या सुट्ट्यामुळे वेरूळलेणी पर्यटकांच्या गर्दीने हाऊस फुल्ल

## वाहतुकीच्या कोंडीमुळे वेरूळ घाट ते वेरूळ गाव रस्ता जाम

**खुलताबाद**
**(अट्टल मत प्रतिनिधी)**

तालुक्यातील वेरूळ येथील बारावे ज्योतिर्लिंग घृष्णेश्वर मंदिरासह विविध देवस्थानांमध्ये आणि धार्मिक स्थळांवर दर्शनासाठी भाविकांच्या लांबच लांब रांगा लागल्या आहेत,जसे की खुलताबाद भद्रा मारुती मंदिर.दिवाळीच्या सुट्ट्यांमुळे वेरूळ मध्ये गर्दी वाढली आहे, वेरूळ येथील बारावे ज्योतिर्लिंग घृष्णेश्वर येथे सात दिवसांत सुमारे ३ लाख भाविकांनी घृष्णेश्वरचे दर्शन घेतले.

अशी माहिती घृष्णेश्वर देवस्थानाचे अध्यक्ष कुणाल दांडगे यांनी दिली दर्शनासाठी शनिवारी पहाटे पासूनच भाविकाच्या घृष्णेश्वरचे दर्शनासाठी भर पावसात लांब रांगा लागल्या होत्या.वेरूळ येथील बारावे ज्योतिर्लिंग मंदिर:पहाटे पासूनच दर्शनासाठी भाविकांच्या रांगा लागल्या आहेत आणि भाविक ‘हर हर महादेव’ व ‘ओम नमः शिवाय’ अशा घोषणा देत आहेत.खुलताबाद तालुक्यातील जगप्रसिद्ध वेरूळ लेणी येथे दिवाळीच्या सुट्ट्या असल्याने मोठ्या प्रमाणावर भाविक व पर्यटक पर्यटनासाठी बाहेर पडला असल्याने जगप्रसिध्द वेरूळ लेणी परिसर पर्यटकांच्या गर्दीने आज शनिवारी हाऊसफुल्ल झाला आहे. वेरूळ लेणी बरोबरच दौलताबाद, बारावे ज्योतिर्लिंग घृष्णेश्वर व खुलताबाद भद्रा मारूती मंदीरातही मोठी गर्दी होत आहे.पर्यटनावर आधारित उद्योग व्यावसायिक आनंदी दिसत आहे. गेल्या दोन दिवसांपासून वाढत्यागर्दीमुळे वेरूळ घाट ते वेरूळ गावापर्यंत सतत ट्रँफीक जाम होत आहे. दिपावलीच्या सुट्ट्यामुळे देशभरातील पर्यटक पर्यटनासाठी बाहेर पडला असल्याने सर्वच पर्यटन व धार्मिक स्थळावर पर्यटकांची मोठी गर्दी दोन दिवसापासून दिसत आहे. शनिवार पर्यटकांच्या हाऊस फुल्ल गर्दीने वेरूळ लेणी, दौलताबाद देवगिरी किल्ला, बारावे ज्योतिर्लिंग श्री घृष्णेश्वर मंदीर,खुलताबाद येथील भद्रा मारूती मंदीरात पर्यटक व



भाविकांची मोठी गर्दी होत आहे.

सकाळपासूनच लेणी बघण्यासाठी पर्यटकांची गर्दी होत असल्याने तिकिटघरावर एकाच वेळी पर्यटकांची गर्दी बघावयास मिळत होती.

पर्यटकांच्या गर्दीने वाहनतळात वाहने लावण्यास जागा मिळत नसल्याने अनेकांनी रस्त्यावर वाहने उभी केली होती. त्याचबरोबर वाहनांच्या गर्दीने लेणी समोर तसेच वेरूळ- खुलताबाद घाटात ट्रँफीक जाम होण्याचा प्रकार घडत होता. त्यामुळे मोठी गैरसोय पर्यटक व भाविकांची होत आहे. पर्यटकांच्या गर्दीने अनेक व्यावसायिक खुश होते,लॉज, हॉटेलात गर्दी दिसत आहे. दौलताबाद देवगिरी किल्ला,भद्रा मारूती मंदीर, घृष्णेश्वर मंदीर भाविकांच्या गर्दीने फुलून गेली होते. दिवाळी पासून पर्यटन हंगाम सुरू झाला असून फेब्रुवारी पर्यंत असाच राहील असे काही व्यावसायिकांनी सांगितले..

वेरूळ येथील बारावे ज्योतिर्लिंग घृष्णेश्वर मंदिरात शनिवारी देशभरातील विविध राज्यातून भगवान महादेवाचे दर्शनासाठी आलेले भाविकांना मंदिर परिसरात लाईट नसल्यामुळे महावितरणच्या विरोधात नाराजगी व्यक्त करताना दिसत होते मंदिर परिसरात विद्युत पुरवठा खंडित झाल्यामुळे.. असे धार्मिक परिसरात लाईट नसल्यामुळे भाविकांना रात्रीच्या वेळी त्रास त्रास सहन करावा लागले होतो,कारण त्यांना मंदिरात जाण्यासाठी अंधारातून जावे लागते आणि यामुळे गैरसोय होते.या समस्येवर मात करण्यासाठी, स्थानिक प्रशासन व मंदिर देवस्थान समितीने प्रकाश व्यवस्थेची सोय करावी,जेणेकरून भाविकांना रात्रीही दर्शन घेणे सोपे होईल* अशावेळी महिलाचे मंगळसूत्र व पाकीट चोरीचे प्रकार घडू शकते याची दक्षता घेणे गरजेचे आहे असे अनुचित प्रकार घडू नाही म्हणून खबरदारी घेण्याचे जबाबदारी महावितरण विभागाचे आहे.

वेरूळ लेणी समोर अनेक भागांत अनधिकृत हॉटेल रस्त्यावर थाटल्याचे दिसून येतात.हे ज्यामुळे वाहतुकीस अडथळे निर्माण होत असल्याच्या तक्रारी वारंवार होत.या पार्श्वभूमीवर.विशेष सार्वजनिक बांधकाम विभागाच्या वतीने धोरण तयार केले होते यासंदर्भात महामार्ग पोलिसांनाही वेळोवेळी कारवाईच्या सूचना दिल्या आहेत.मात्र दोन्ही प्रशासनांकडून ठोस कारवाई केली जात नसल्यामुळे समस्या अधिक वाढली आहे असल्याची तक्रार नागरिकांकडून केली जात आहे. लेणी समोर महावीर स्तंभ येथे रस्ता अडवून हॉटेल व्यवसाय सुरू करण्यात आला आहे. त्यामुळे इतर वाहनांना मार्ग मिळत नसल्याने या परिसरात प्रचंड वाहतूक कोंडीची समस्या निर्माण झाली आहे.

# फुलंब्री नगरपंचायतीसाठी काँग्रेसचा स्वबळाचा नारा



**छत्रपती संभाजीनगर**
**(अट्टल मत प्रतिनिधी)**

येथील नगरपंचायत निवडणुकीसाठी काँग्रेस पदाधिकाऱ्यांनी ’स्वबळावर लढा’ असा नारा दिला. खासदार डॉ. कल्याण काळे यांच्या संपर्क कार्यालयात झालेल्या काँग्रेस पदाधिकारी व कार्यकर्त्यांच्या शुक्रवारी (ता. २४) झालेल्या विशेष बैठकीत हा निर्णय घेण्यात आला.

यावेळी काळे यांच्यासह सेवा दलाचे प्रदेशाध्यक्ष विलास औताडे, तालुकाध्यक्ष संतोष मेटे, जिल्हा दूध संघाचे संचालक संदीप बोरसे, अजगर पटेल, अशपाक पटेल, अल्पसंख्याक अध्यक्ष इद्रिस पटेल, प्रशांत नागरे, मुदतसर पटेल, जमीर पठाण, राहुल सोनवणे, अंबादास गायके, बाबूराव डकले यांची प्रमुख उपस्थिती होती. काही पदाधिकाऱ्यांनी पुन्हा एकदा महाविकास आघाडीच्या सूत्रावर लढा द्यावा अशी मागणी केली, तर अनेकांनी ’काँग्रेस पक्ष स्वबळावर लढू शकतो, आपली ताकद पुरेशी आहे’ असा आग्रह धरला. काही कार्यकर्त्यांनी आघाडी करण्यास हरकत नसली तरी नगराध्यक्षपदाचा चेहरा हा काँग्रेसचा असावा, अशी अट ठेवली. सर्वांच्या मतांचा आढावा घेत एकमुखीपणे काँग्रेस स्वबळावर लढा देईल, असा प्राथमिक निर्णय घेण्यात आला. मात्र याला अंतिम मान्यता जिल्हा काँग्रेस कमिटीच्या आगामी बैठकीत दिली जाणार आहे.

> “ नगरपंचायत निवडणुकीसंदर्भातील बैठकीमध्ये काँग्रेसने स्वबळावर लढले पाहिजे, तर काहींनी महाविकास आघाडी करण्याच्या सूचना केल्या. मात्र, गतवेळेस काँग्रेसने मित्रपक्षाला नगराध्यक्षपदाची संधी दिली होती. यावेळेस मित्र पक्षानेही मोठे मन करून महाविकास आघाडी केल्यास काँग्रेसला नगराध्यक्षपदासाठी सहकार्य करावे.
> – डॉ. कल्याण काळे, खासदार

# सहकारी संस्थांच्या मालमत्ता विक्रीसाठी उपनिबंधकांची पूर्वपरवानगी अनिवार्य

**छत्रपती संभाजीनगर**
**(अट्टल मत प्रतिनिधी)**

सहकारी संस्थांच्या मालमत्तांची विक्री करण्यासाठी तालुका उपनिबंधक कार्यालयाची वा त्या कार्यालयाने नेमलेल्या प्रशासकाची पूर्वपरवानगी अनिवार्य असल्याचे तालुका उपनिबंधक सहकारी संस्था यांनी कळविले आहे. अनेक सहकारी संस्थांची मालमत्ता, जमीन, प्लॅट इ. अनियमित, बेकायदेशीर विक्री केलेबाबत तक्रारी प्राप्त होत असल्याच्या पार्श्वभुमिवर तालुका उपनिबंधक यांनी कळविले आहे की, महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० व नियम १९६१ अन्वये नोंदणीकृत सहकारी संस्थाची मालमत्ता, जमीन खरेदी – विक्री प्रकरणांच्या बाबत उपनिबंधक सहकारी संस्था या कार्यालयाचे नाहरकत प्रमाणपत्र, पूर्वपरवानगी असल्याशिवाय तसेच या कार्यालयाने नेमलेला अवसायक, प्रशासक, प्राधिकृत अधिकारी यांचे नाहरकत प्रमाणपत्र तसेच या कार्यालयाची पूर्व परवानगी असल्याशिवाय अशा मालमत्तेची खरेदी – विक्री करण्यात येऊ नये, असे आवाहन तालुका उपनिबंधक विलास कोळेकर यांनी कळविले आहे.

# जिल्हा कुपोषणमुक्त करण्यासाठी जिल्हाधिकाऱ्यांची पंचसूत्री

## ६५१ बालकांना १४ नोव्हेंबरपर्यंत कुपोषणाच्या विळख्यातून बाहेर काढणार

**छत्रपती संभाजीनगर**
**(अट्टल मत प्रतिनिधी)**

जिल्ह्यात ६५१ बालके कुपोषण श्रेणीत आहेत. या सर्व बालकांना येत्या १४ नोव्हेंबर पर्यंत कुपोषणाच्या विळख्यातून बाहेर काढून जिल्हा कुपोषणमुक्त करण्यासाठी जिल्हाधिकारी दिलीप स्वामी यांनी आज पंचसूत्री दिली आहे. त्यानुसार महिला व बालविकास, आरोग्य, ग्रामविकास व महसूल यंत्रणांनी समन्वयाने काम करुन जिल्हा कुपोषण मुक्त करावा,असे निर्देश जिल्हाधिकरी स्वामी यांनी आज दिले.

महिला बालविकास विभाग, आरोग्य विभाग, महसूल विभाग आणि ग्रामविकास विभाग या यंत्रणांच्या ग्राम,




तालुका, उपविभाग व जिल्हास्तरीय यंत्रणेतील अधिकाऱ्यांशी आज जिल्हाधिकाऱ्यांनी दूरदृष्यप्रणालीद्वारे संवाद साधला. निवासी उपजिल्हाधिकारी जनार्दन विधाते यावेळी उपस्थित होते. जिल्हाधिकारी स्वामी यांनी सांगितले की, जिल्ह्यात ६५१ बालके कुपोषित श्रेणीत येतात.

तालुकानिहाय- छत्रपती संभाजीनगर-८०, कन्नड-२८, फुलंब्री ६१, सिल्लोड-९५, सोयगाव-६०, गंगापूर-१००, पैठण-१२८, वैजापूर-३८, खुलताबाद-६१ याप्रमाणे कुपोषित बालकांची संख्या आहे. या सर्व बालकांना कुपोषण श्रेणीतून बाहेर काढण्यासाठी बालदिन म्हणजेच १४ नोव्हेंबर पर्यंतचा कालबद्ध कार्यक्रम देण्यात आला.

कालबद्ध कार्यक्रम- दि.१६ ऑक्टोंबर रोजी गावातील कुपोषित बालकांची नोंद घेऊन ही बालके संबंधित अधिकारी, कर्मचारी यांनी दत्तक घेणे; त्यांच्या आहार, आरोग्य विषयक दैनंदिन घडामोडींवर लक्ष ठेवणे.

दि.१७ ऑक्टोंबर रोजी स्वच्छता दिवस पाळून बालकांच्या आरोग्यकारक स्वच्छतेविषयी त्यांच्या पालकांना माहिती देणे. दि.२८ ऑक्टोंबर रोजी गावातील मान्यवरांच्या हस्ते बालकांचा पौष्टिक खाऊ देणे.

दि.३ व ४ नोव्हेंबर रोजी प्राथमिक आरोग्य केंद्रामार्फत बालकांची आरोग्य तपासणी करणे. दि.७ नोव्हेंबर रोजी पालकांचे समुपदेशन मेळावे घेऊन त्यांना बालकांना द्यावयाचा आहार, पोषणमुल्य युक्त अन्न, आरोग्याची काळजी, वैयक्तिक स्वच्छता इ.बाबत मार्गदर्शन करणे. याप्रमाणे कालबद्ध व उद्दिष्टाधारीत प्रयत्न करुन दि.१४ नोव्हेंबर बाल दिन यादिवशी जिल्ह्यातील ही सर्व ६५१ बालके कुपोषण श्रेणीतून बाहेर आणण्यासाठी सर्व यंत्रणांनी प्रयत्न करावे,असे निर्देश जिल्हाधिकारी स्वामी यांनी दिले.

## खुलताबाद न.प.आगामी निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर राष्ट्रवादी काँग्रेसकडून इच्छूकांच्या मुलाखती



**खुलताबाद (अट्टल मत प्रतिनिधी)**

खुलताबाद नगरपरिषद आगामी निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर खुलताबाद शहरातील १० प्रभागातील इच्छूक उमेदवारांच्या मुलाखती आज रविवारी राष्ट्रवादी अजित पवार गटाचे संपर्क कार्यालयात इथे पार पडल्या.खुलताबाद नगरपरिषद निवडणुकीसाठी इच्छुक उमेदवारांची मुलाखती राष्ट्रवादी पक्षाच्या संपर्क कार्यालयात पक्ष निरीक्षक तथा तालुकाध्यक्ष सुरेश जाधव यांच्या प्रमुख उपस्थितीत.नगराध्यक्ष पदासाठी ६ उमेदवारांनी तर नगरसेवकपदी साठी ६५ उमेदवारांनी मुलाखती दिल्या. यावेळी जिल्हा उपाध्यक्ष दिनेश सावजी,शहराध्यक्ष गजानन फुलारे, कार्याध्यक्ष तौसीफ अहमद,शेख वाजेद यांची उपस्थिती होती.

नगराध्यक्ष पदासाठी इच्छुक उमेदवार माजी नगराध्यक्ष कैसरोद्दीन. माजी नगराध्यक्ष हाजी अकबर बेग.माजी नगरसेवक आयाज बेग. शहराध्यक्ष गजानन फुलारे, सामाजिक कार्यकर्ते शेख वाजेद, माजी नगरसेवक मुनिबोद्दीन यांनी नगराध्यक्ष पदासाठी मुलाखती दिली.

# घरकुल लाभार्थ्यांसाठी केलेल्या आमरण उपोषणाचा विजय - योगेश अचलखांब



**छत्रपती संभाजीनगर (अट्टल मत प्रतिनिधी)**

घरकुल हप्त्याच्या वितरणाची मागणी संदर्भात जालना तालुक्यातील मानेगाव खालसा येथील युवक सामाजिक कार्यकर्ते योगेश अचलखांब यांनी माता रमाई घरकुल योजनेसह सर्व घरकुल योजनेअंतर्गत मंजूर झालेल्या लाभार्थ्यांचे थकीत हप्ते तत्काळ वितरित करण्याच्या मागणीसाठी ग्रामपंचायत समोर आमरण उपोषण दोन दिवसापासून सुरू होते या संदर्भात दिलेल्या निवेदनात त्यांनी नमूद केलेले होते की जालना पंचायत समिती समितीच्या घरकुल विभागाच्या अभियंता वर्गाच्या कम तरता असल्यामुळे अनेक लाभार्थ्यांचे प्रलंबित होते त्यामुळे घरकुल विभागात अभियंता वर्गात आवश्यक तेवढी वाढ करून प्रलंबित प्रश्न मार्गी लावावेत अशी मागणी करण्यात आली.



उपोषणाच्या दुसऱ्या दिवशी युवा सेनेचे अभिम न्यू खोतकर यांनी उपोषणा स्थळे येऊन पंचायत समिती स्तरावर फोन लावून सूचना केले की आपण लवकरात लवकर कलेक्टर लेवलवर प्रस्ताव पाठवावा घरकुल हप्ते सात दिवसात वितरित करा यावेळी माजी आमदार अरविंद अण्णा चव्हाण यांनी उपोषण कार्यकर्त्याची भेट घेऊन पंचायत समितीचे विस्तार अधिकारी श्री आर डी देशमुख. आर एस सूर्यवंशी व मानेगाव खालसा येथील ग्रामसेवक आयु.गोरेसाहेब यांच्या लेखी प्रस्तावानंतर पाणी पाजून उपोषण सोडले यावेळी सर्व गावकरी व लाभार्थी यांनी आनंद व्यक्त केला.

# स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुका रिपाइं महायुती सोबत लढणार: बाबुराव कदम

## पक्षाला हव्यात जि.प.च्या ५ आणि महापालिकेच्या १० जागा



**छत्रपती संभाजीनगर (अट्टल मत प्रतिनिधी)**

आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (आठवले) महायुती सोबत लढणार असून कार्यकर्त्यांनी निवडणुकीच्या कामाला लागावे असे आवाहन रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (आठवले)चे प्रदेश कार्याध्यक्ष बाबुराव कदम यांनी केले आगामी स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुका आणि महाड येथे होणारे पक्षाचे राष्ट्रीय अधिवेशन या संदर्भात रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडियाची जिल्हा आढावा बैठक आज शनिवारी दिनांक २५ ऑक्टोबर रोजी सुभेदारी विश्रामगृह येथे आयोजित करण्यात आले होते त्यात ते बोलत होते.

या बैठकीला मराठवाडा अध्यक्ष मि लिंद शेळके राज्य उपाध्यक्ष दौलत खरात शहर जिल्हाध्यक्ष नागराज गायकवाड बाळकृष्ण इंगळे अरविंद अवसरमल रमेश दाभाडे युवा जिल्हाध्यक्ष राकेश पंडित यांची प्रमुख उपस्थिती होती यावेळी पुढे बोलताना श्री.कदम म्हणाले नुकती छत्रपती संभाजीनगरामध्ये गायरान हक्क परिषद झाली.

या परिषदेला चांगला प्रतिसाद मिळाला आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका पक्षाने भाजप शिवसेना महायुती सोबत लढण्याचा निर्णय घेतला आहे छत्रपती संभाजी नगर जिल्ह्यात जिल्हा परिषदेच्या पाच महानगरपालिकेच्या दहा जागा आणि पंचायत समितीच्या दहा जागा नगर परिषदेच्या योग्य त्या प्रमाणात रिपब्लिकन पार्टीला महायुतीने सोडाव्यात तशी मागणी महायुतीच्या नेत्यांकडे करण्यात येईल पक्ष कार्यकर्त्यांनी स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुकीसाठी कामाला लागावे गाव पातळीवर जाऊन निवडणुकीची तयारी करावी ३ नोव्हेंबर रोजी पक्षाच्या वर्धापन दिनानिमित्त महाड येथे भव्य सभा आयोजित करण्यात आली असून या सभेला केंद्रीय सामाजिक न्याय मंत्री तथा पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष रामदास आठवले हे संबोधित करणार आहे याशिवाय कोकणातून अनेक मान्यवरांना निमंत्रित करण्यात आले आहे.

छत्रपती संभाजी नगरातून हजारो कार्यकर्ते महाडच्या अधिवेशनासाठी जाणार असल्याचे श्री.कदम यांनी सांगितले या बैठकीला मनोज सरीन किशोर साळवे सतीश महापुरे श्री.अमराव शरद शेगावकर ज्ञानेश्वर खरात सुनील अडसूळ कृष्णा वाहुळ विकास राऊत विश्वजीत काळे नितीन साळवे प्रशांत वाहुळ आनंद शिंदे रवी बागुल नितीन सूर्यवंशी धम्मपाल सुरडकर खुलताबाद तालुका अध्यक्ष फकीरराव भालेराव कन्नड तालुका अध्यक्ष संदीप सातदिवे, वैजापूर तालुका अध्यक्ष बाळासाहेब त्रिभुवन, मि लिंद जाधव, बाळासाहेब सातदिवे, अरुण सातदिवे, संतोष साबळे, सुनील बोर्डे, अरुण दरेकर, समाधान शिरसाठ, डॉक्टर जयचंद कासलीवाल, अमोल कोतकर, सुखदेव जगताप, केके जगताप, यांच्यासह जिल्ह्यातील पक्षाचे पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते

## एमके इको व्हील्स आणि सर्व्हिसेसचा शुभारंभ



एमके इको व्हील्स आणि सर्व्हिसेस या नुतन भव्य दालनाचा मंत्री अतुल सावे यांच्या हस्ते भव्य शुभारंभ करण्यात आले. याप्रसंगी सनएजचे देवीदास म्हस्के.

## बेवारस वाहनांच्या मालकांना आवाहन

छत्रपती संभाजीनगर - वेदांतनगर पोलीस ठाणे येथे बेवारस म्हणून नोंद घेण्यात आलेल्या २५ दुचाकी वाहनांची निर्गती करावयाची आहे. या वाहनांच्या मूळ मालकांनी वेदांतनगर पोलीस स्टेशनला संपर्क साधवा, असे आवाहन पोलीस निरीक्षक वेदांतनगर यांनी केले आहे.

## - सुचना -

### 'अट्टलमत'चे ओळखपत्र जमा करण्याबाबत

'अट्टल मत'च्या अनेक प्रतिनिधींच्या ओळखपत्राची तारीख संपली आहे. तरी त्यांनी जुने ओळखपत्र जमा करून नवीन ओळखपत्रासाठी कार्यालयाशी संपर्क साधवा. अनेक भुरटे पत्रकार अट्टलमतच्या नावाने अधिकाऱ्यांना, कंत्राटदारांना धमकवत असल्याचे कळाले आहे तरी अधिकृत प्रतिनिधींनी ओळखपत्र अपटेड करून घ्यावे, ज्या प्रतिनिधींच्या ओळखपत्रांचा कालावधी संपला आहे. त्यांची यादी पोलिसांत देण्यात आली आहे. आपल्या ओळखपत्राचा गैरवापर झाल्यास कायदेशीर कारवाई करण्यात येईल. याची काळजी आपण घ्यावी ही विनंती.

- संपादक

कार्यालय : शॉप नं. ३, केशरदिप कॉम्प्लेक्स, एन- ७ पोलीस स्टेशन जवळ, सिडको

हे साप्ताहिक मालक, मुद्रक , प्रकाशक व संपादक - श्री. रशपालसिंघ एन.अट्टल यांनी मानसी प्रिंटर्स, प्लॉट नं. ४५, सर्व्हिस इंडस्ट्री सेक्टर सिडको, औरंगाबाद ४३१००५ (महा.) येथे छापून कार्यालय : शॉप नं. ३, केशरदिप कॉम्प्लेक्स, एन- ७ पोलीस स्टेशन जवळ, सिडको , औरंगाबाद ४३१००३, (महा.) येथे प्रसिध्द केले. या अंकातील मजकुराशी संपादक जबाबदार राहतीलच असे नाही ( यासंबधी कोणताही वाद औरंगाबाद न्यायालयात राहील.) मो. ७५८८१६६४९६, ९६२३४८४४८४. email : attalmat@gmail.com. RNI.No. MAHMAR/2007/21199